**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-202**

# देसाई कॉलेजमध्ये १५, १६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण

**पाटण :** येथील बाळासाहेब देसाई कॉलेजचा आय. क्यू.ए.सी फेस्टिवल तसेच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवार १५ व शुक्रवार १६ रोजी संपन्न होत असल्याची माहिती प्राचार्य डॉ.एस. डी. पवार यांनी दिली. गुरुवार १५ रोजी आय. क्यू.ए.सी फेस्टिवल आयोजन करण्यात आला असून या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांच्या हस्ते व संचालक संजीव चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी ग्रंथप्रदर्शन, कलामंच, रांगोळी व मेहंदी, फोटोग्राफी प्रदर्शन अशा स्पर्धा सोबतच फूड फेस्टिवलंचे आयोजन करण्यात आले. शुक्रवार १६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील एम.डी माने ग्रुप ऑफ कंपनीचे चेअरमन रामदास माने तसेच अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.